नि.फौ.ख.क्र. ९२/२०१७
नि. ५७

## नि. ५७ वर आदेश

आरोपी क्र. १ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०५ प्रमाणे त्यांची गैरहजेरी कायमस्वरुपी माफ होवुन मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज अभिलेखावर दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जातील कथनाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण हे दोषारोपपुर्वीचे पुराव्याकरीता नेमण्यात आलेले आहे. अर्जदार यांचे कथनाप्रमाणे त्यांचे हदयावर शस्त्रक्रिया झाली असुन त्यांना डॉक्टरांनी सक्तीची विश्रांती घेण्याकरीता तसेच ताणतणावापासुन दुर राहण्यास सांगितले आहे. तसेच अर्जदार यांना उच्च रक्तदाब व मधुमेह असे गंभीर आजार असल्याने त्यांना न्यायालयात कामकाजाकरीता हजर राहणे अशक्य झाले आहे. आरोपी हे प्रस्तुत खटल्याचे कामी त्यांची ओळख आव्हानित करणार नाहीत. तसेच न्यायालयाचे अटी व शर्तीचे पालन करण्यास अर्जदार तयार आहेत. न्यायालय सांगतील त्यावेळेस आरोपी न्यायालयामध्ये हजर राहण्यास तयार आहे. त्यामुळे अर्जदाराची गैरहजेरी माफ करण्याची विनंती आरोपी क्र. १ तर्फे विद्वान विधीज्ञांनी केली.

३. सदर अर्जास फिर्यादीतर्फे म्हणणे दाखल करण्यात येवुन प्रस्तुत अर्जातील सर्व कथने त्यांनी नाकारलेली आहेत. फिर्यादी यांचे कथनाप्रमाणे आरोपी यांनी नि. ५८ कागदयादी सोबत दाखल केलेली कागदपत्रे ही सन २०१९ मधील आहेत. आरोपी हे ठणठणीत असुन ते सर्वत्र फिरत असतात. तसेच आरोपी हे दुचाकी व चारचाकी वाहन देखील चालवितात. निव्वळ न्यायालयामध्ये तारखेस हजर राहण्यास लागु नये म्हणुन खोटया मजकूराचा अर्ज आरोपी क्र. १ ने दाखल केल्याचे दिसुन येत असल्याने तो नामंजुर करण्यात यावा अशी विनंती फिर्यादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी केली.

४. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता आरोपी क्र. १ यांचे हदयावर शस्त्रक्रिया झाल्याचे नि. ५८ कागदयादीसोबत दाखल कागदपत्रांवरुन दिसुन येत आहे. परंतू, सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता आरोपी हे दि. ०१/०७/२०१९ ते दि. १३/०७/२०१९ या काळाकरीता दवाखान्यामध्ये दाखल असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे आरोपी यांचे झालेले उपचार हे सन २०१९ मधील असल्याचे दिसुन येते. परंतू, प्रस्तुतकामी आजरोजी आरोपी हे न्यायालयात कायमस्वरुपी गैरहजर राहण्यास पात्र असल्याबाबतचे कोणताही कागदोपत्री पुरावा त्यांनी दाखल केलेले नसल्याचे दिसुन येत आहे. आरोपी हे न्यायालयाने घालुन दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्यास तयार असल्याचे व आवश्यकता भासल्यास न्यायालयात हजर राहण्यास तयार असल्याचे कथन केलेले आहे. प्रस्तुतकामी दोषारोपपुर्वीचा पुरावा झालेला असुन त्याबाबत युक्तिवाद देखील झालेला आहे. त्यानंतर

आरोपी यांनी प्रस्तुतचा अर्ज अभिलेखावर दाखल केलेला आहे. त्यामुळे दोषारोपपुर्वीचा पुरावा झाल्यानंतर होणा-या आदेशाकरीता आरोपी यांची उपस्थिती न्यायालयामध्ये गरजेची असल्याचे कायदयातील प्रचलित तरतुदीप्रमाणे दिसुन येते. आरोपी हे आवश्यकता भासल्यास नेमले तारखेस त्यांचा गैरहजेरीचा अर्ज अभिलेखावर दाखल करु शकतात. प्रस्तुतचे प्रकरण हे सन २०१७ पासुन प्रलंबित आहे. यासर्व कारणांचा एकत्रीत विचार करता आरोपी क्र. १ यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश पारित.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी क्र. १ यांचा ५७ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. आरोपी क्र. १ यांनी पुढील नेमलेल्या तारखेस हजर राहण्याबाबत आदेशित करण्यात येते.

**<u>सही/-xxx</u>**

दि. २९/०८/२०२३ (जी.ए. कुलकर्णी)

ठिकाण - दौंड प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. ०५),

दौंड, ता. दौंड, जि. पुणे